संक्षिप्त फौ. ख. क्र.९२/२०२२
सरकार -वि.- लखन
नि.क्र. २ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - सुरेश युवराज कामडी,
वय ३९ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – मेंडकी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. घटना कधीची आहे ते मला माहीत नाही त्यावेळी मी माझ्या गावाला होतो. घटना कशी घडली काय घडली ते मला माहीत नाही. पोलिसांनी माझे बयान घेतले नव्हते.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. आता मला माझ्या बयानातील अधोरेखीत भाग अ वाचून दाखविण्यात आला. तसे काही घडले नव्हते. तसे माझ्या बयानात का लिहून घेतले याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**

३. नाकारला.
उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
दिनांक - १७.०४.२०२६
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.